सत्यमेव जयते

महाराष्ट्राचे राज्यपाल

# डॉ. पी. सी. अलेक्झांडर

यांचे

# अभिभाषण

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे मुंबई येथील संयुक्त अधिवेशन

१२ मार्च २००१

**सभापती महोदय, अध्यक्ष महाराज आणि सन्माननीय सदस्यहो,**

राज्य विधानमंडळाच्या २००१ मधील पहिल्या अधिवेशनात आपले स्वागत करताना मला अतिशय आनंद होत आहे. प्रारंभी, यावर्षी, २६ जानेवारी रोजी गुजरातला हादरा देणा-या प्रलयंकारी भूकंपात मृत्युमुखी पडलेले दुर्दैवी पुरुष, स्त्रिया व मुले या सर्वांना मी श्रद्धांजली अर्पण करतो. जुलै २००० मध्ये घाटकोपर येथे दरड कोसळून ७१ लोकांच्या मृत्युस कारणीभूत ठरलेल्या दुर्घटनेचेही मी दुःखी अंतःकरणाने स्मरण करतो. तसेच, २०००-२००१ या वर्षात निधन पावलेल्या राज्य विधानमंडळाच्या सदस्यांनाही मी माझी श्रद्धांजली अर्पण करतो.

२. महाराष्ट्रात नव्या शासनाने सत्ता ग्रहण करून आता एका वर्षाहून अधिक काळ लोटला आहे. समान किमान कार्यक्रमात दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी शासन मनःपूर्वक व बांधीलकीने कार्य करीत आहे, हे सांगण्यास मला आनंद होत आहे. सामान्य जनतेच्या जीवनात सुधारणा करण्यासाठी पंचायत राज संस्था, उद्योग, कापड गिरण्यांच्या जमिनी, माहिती तंत्रज्ञान, झोपडपट्टी पुनर्विकास, शिक्षण आणि रोजगार व स्वयंरोजगार निर्मिती यासंबंधात अनेक धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहेत. याचा लाभ जास्तीत जास्त जनतेपर्यंत पोहोचावा म्हणून या धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी माझे शासन जोमाने पाठपुरावा करीत आहे.

३. २६ जानेवारी,२००१ रोजी झालेल्या जबरदस्त भूकंपामुळे गुजरात राज्याचे अनेक भाग उध्वस्त झाले आहेत. माझ्या शासनाने विशेष मदत कार्याला तात्काळ सुरुवात केली. मला सांगण्यास अभिमान वाटतो की, भूकंपग्रस्तांच्या मदतीसाठी धावून जाणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. महाराष्ट्रातील जनतेने, स्वयंसेवी संघटनांनी आणि शासकीय व निमशासकीय

विभागांनी मोठया प्रमाणात मदतकार्याला वाहून घेतले आहे. अन्नधान्ये, साखर, दुग्धजन्य उत्पादने, शुद्ध पाणी यांसारख्या जीवनावश्यक वस्तू, तसेच, ब्लँकेटस्, भांडी, टिनचे पत्रे व तंबू यांसारखी आवश्यक साधनसामग्री भचाऊ, भूज व अहमदाबाद या ठिकाणी ताबडतोब पाठविण्यात आली. भूकंपग्रस्तांना तत्परतेने मदत करण्यासाठी व त्यांच्या बचावासाठी तसेच, दगड, विटा व मातीचे ढिगारे दूर करण्याकरिता आवश्यक ती यंत्रसामग्रीसुद्धा शासनाने तातडीने पाठवली आहे. भूज जिल्ह्यातील सर्वात जास्त हानी पोहोचलेल्या भचाऊ तालुक्यावर माझ्या शासनाने आपले मदत कार्य केंद्रित केले असून अधोई व वोंध या दोन गावांच्या संपूर्ण पुनर्वसनाची जबाबदारी महाराष्ट्राने स्वीकारली आहे.

भूकंपग्रस्त भागात महाराष्ट्रातून तीन वैद्यकीय पथके, जीवरक्षक औषधे व उपकरणे घेऊन तात्काळ पाठवली गेली . त्यांनी, जखमींना वाचवण्यासाठी सुमारे ६००० मोठया व छोटया शस्त्रक्रिया पार पाडल्या. गंभीर जखमी झालेले ७०२ रुग्ण महाराष्ट्रातील विविध रुग्णालयांमध्ये विशेष उपचारासाठी आणण्यात आले. याशिवाय, नागरी संरक्षण दल, अग्निशमन पथक, होमगार्ड आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तांत्रिक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी भूकंपग्रस्त भागात मदत कार्यास विशेष हातभार लावला.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने या कार्यासाठी मनुष्यबळ व १.५ कोटी रुपयांची साधनसामग्री पुरविली. मुंबई येथील राज्य मुख्यालय व भचाऊ येथील मदत शिबिर यांच्यामधील संदेशवहनाच्या कामाची व्यवस्था महाराष्ट्र पोलिसांनी केली आहे. महाराष्ट्रातील जनतेने गुजरातसाठी मुख्यमंत्री सहायता निधीकरिता आतापर्यंत १९.५० कोटी रुपये इतके अंशदान दिले आहे. महाराष्ट्र शासनाने हाती घेतलेल्या मदत व पुनर्वसन कार्यासाठी सर्व राज्य शासकीय कर्मचारी एक दिवसाचे वेतन देणार आहेत.

४. सन २००१-२००२ या वर्षासाठी ११,७२०.५६ कोटी रुपये नियतव्ययाच्या वार्षिक योजनेला नियोजन आयोगाच्या मान्यतेच्या अधीन अंतिम रूप देण्यात आले आहे.

पुनर्रचित निर्देशांक व अनुशेष समितीच्या अहवालामधील शिफारशी मी स्वीकारल्या आहेत. ३१ मार्च, २००१ रोजी असलेला उर्वरित अनुशेष ५ वर्षांच्या कालावधीत भरून काढण्याची भूमिका माझ्या शासनाने घेतली आहे. हा अनुशेष भरून काढण्याकरिता २००१-२००२ या वर्षासाठीच्या नियतव्ययामध्ये ११०० कोटी रुपयांवरून १७२० कोटी रुपयांची तरतूद करण्याचे ठरविण्यात आले आहे. म्हणजेच, वार्षिक योजनेच्या नियतव्ययाच्या सुमारे ९ टक्क्यांवरून १४.६८ टक्के इतकी लक्षणीय वाढ करण्यात आली आहे. उर्वरित अनुशेष विचारात घेऊन, एकूण नियतव्ययापैकी विदर्भासाठी ५०.०६ टक्के , मराठवाडयासाठी २८.५२ टक्के आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी २१.४२ टक्के अशी तरतूद करण्यात आली आहे.

माझ्या शासनाने ऑक्टोबर २००० मध्ये एक वर्षाचा कार्यकाल पूर्ण केला आहे. या निमित्ताने शासनाने विविध भौतिक व सेवाविषयक पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी आणि मानवी साधनसंपत्तीच्या विकासात वाढ करण्यासाठी आखलेला "**संकल्प आराखडा महाराष्ट्र , २००५**" तयार केला आहे.

५. महाराष्ट्र हे देशामध्ये औद्योगिक क्षेत्रात सातत्याने आघाडीवर असलेले राज्य असून देशातील व विदेशातील गुंतवणुकदार येथे गुंतवणूक करणे पसंत करतात. गेल्या वर्षात २२,०३१ कोटी रुपयांच्या अतिरिक्त गुंतवणुकीसह उद्योजक आवेदनपत्रांच्या संख्येत ७,६०५ वरून ८,३३८ इतकी वाढ झाली असून ऑगस्ट, १९९१ पासून डिसेंबर,२००० पर्यंत एकूण गुंतवणूक १,९७,८८३ कोटी रुपये इतकी झाली आहे. ऑगस्ट,१९९१ पासून नोव्हेंबर,२००० पर्यंत थेट विदेशी गुंतवणुकीच्या प्रस्तावांची संख्या १,९७३ इतकी झाली असून त्याद्वारे एकूण गुंतवणूक ४८,१५३ कोटी रुपये झाली आहे. ही गुंतवणूक देशातील इतर सर्व राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक आहे.

माझ्या शासनाने, अलिकडेच औद्योगिक धोरण, २००१ मान्य केले आहे. सातत्याने प्रगती व रोजगार निर्मिती आणि उपजीविकेच्या संधींमध्ये वाढ हा या धोरणाचा मुख्य गाभा आहे. या धोरणानुसार नवी मुंबई येथील

द्रोणागिरी येथे सिडकोद्वारा सध्या विकसित होत असलेल्या प्रक्षेत्राशिवाय औरंगाबाद आणि नागपूर येथे विशेष आर्थिक प्रक्षेत्रांची स्थापना करण्यात येईल. याशिवाय, ग्रेप-वाईन पार्क, ऑरेंज सिटी पार्क, पुष्पसंवर्धन संकुले आणि जैविक-तंत्रशास्त्रीय उद्याने यांसह कृषि उद्योगांसाठी संकुले उभारण्यात येतील. तसेच, वीज शुल्कामधून सूट, मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी माफी, यांसारखी प्रोत्साहने, लघुउद्योग घटकांकरिता विशेष भांडवली प्रोत्साहने आणि लघुउद्योग क्षेत्रातील कपडे, वस्त्रनिर्माण आणि होजीअरी घटकांना व्याजी अर्थसहाय्य देणे ही या नवीन औद्योगिक धोरणाची ठळक वैशिष्टये आहेत. कामगारांच्या न्याय्य हितसंबंधांचे रक्षण करीत असतानाच उद्योग व कामगार यांना नवीन आव्हाने पेलणे शक्य व्हावे म्हणून माझ्या शासनाने औद्योगिक विवाद अधिनियम आणि कंत्राटी कामगार सेवा (विनियमन व उच्चाटन ) अधिनियम आणि कार्यपध्दती यांचे पुनर्विलोकन करण्यास प्रारंभ केला आहे.

६. अपारंपरिक ऊर्जा साधनांमध्ये वाढ करण्यासाठी, पवन ऊर्जेद्वारे ४४३ मेगावॅट क्षमतेची ऊर्जा निर्मिती करणा-या खाजगी उद्योजक प्रकल्पांना शासनाने मान्यता दिली असून या प्रकल्पांपैकी १५४ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प यापूर्वीच कार्यान्वित झाले आहेत. तसेच, माझ्या शासनाने चिपाडावर आधारित सुमारे १७० मेगावॅट क्षमतेच्या वीज निर्मिती प्रकल्पांना मान्यता दिली असून ते कार्यान्वित होत आहेत.

कोयना प्रकल्पाच्या चौथ्या टप्प्यातील शेवटचे युनिट यावर्षी कार्यान्वित झाले असून त्याची अतिरिक्त विद्युत निर्मिती क्षमता २५० मेगावॅट आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने केलेल्या प्रशुल्क वाढीचा भार कमी करण्यासाठी शेतकरी आणि यंत्रमागधारक यांना ८०० कोटी रुपयांचे अर्थसहाय्य देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

७. सॉफ्टवेअर व माहिती तंत्रज्ञान उद्योगामध्ये महिलांना रोजगाराची अधिक संधी प्राप्त व्हावी म्हणून, शासनाने मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियमाच्या काही तरतुदींमधून या उद्योगाला सूट दिली आहे. माझ्या शासनाने औद्योगिक घटकांना बंधनकारक असलेल्या प्रपत्रांची संख्या कमी केली असून विविध कामगार कायद्यांखालील कार्यपद्धती सुलभ केली आहे.

माझ्या शासनाने, सर्व शेतमजुरांचे किमान वेतन दहा रुपयांनी वाढविण्याचे ठरविले आहे.

८. पाण्याचा कार्यक्षमतेने वापर करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी ठिबक सिंचनाकरिता सर्वसाधारण प्रवर्गातील शेतक-यांना देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यामध्ये ५० टक्क्यांऐवजी ७५ टक्के इतकी आणि अनुसूचित जाती व जमातीतील शेतकऱ्यांच्या बाबतीत ९० टक्के इतकी वाढ करण्यात आली असून अर्थसहाय्याची मर्यादा देखील प्रति हेक्टरी २०,५०० रुपयांवरून ३२,००० रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे.

सन २०००-२००१ या वर्षापासून ग्रामीण क्षेत्रामध्ये कृषिविषयक शिक्षणास चालना देण्यासाठी, शासनाने कृषि शाळा आणि कृषि व त्याच्याशी संलग्न विषयातील पदवी महाविद्यालयांना विना-अनुदान तत्त्वावर मान्यता देण्याचे ठरविले आहे.

कृषि विद्यापीठांना भेडसावणा-या आर्थिक अडचणी दूर करण्याकरिता, शासनाने, २०००-२००१ या वर्षापासून त्यांच्या, सहायक अनुदान सूत्रामध्ये सुधारणा केली आहे.

शासनाने, बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथे महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ या राज्य शासनाच्या उपक्रमामार्फत खत प्रकल्प स्थापन करण्याचे प्रस्तावित केले आहे.

९. महाराष्ट्रात गेल्या वर्षी खूपच अनियमित पाऊस झाल्यामुळे २३ जिल्ह्यांमधील २०,५१९ गावांची पैसेवारी ५० पैसे किंवा त्यापेक्षा कमी असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. टंचाईग्रस्त गावांमध्ये माझ्या शासनाने, रोजगार हमी योजनेअंतर्गत दुष्काळ निवारण कामे पुन्हा सुरु करणे, तसेच, पिण्याच्या पाण्याच्या पुरवठयाकरिता तातडीच्या उपाययोजना करणे, आवश्यक तेथे पुन्हा पेरणी करण्यासाठी बी-बियाणे व खत पुरविणे, जनावरांसाठी चारा पुरविणे यासारख्या आवश्यक उपाययोजना हाती घेतल्या आहेत.

१०. राज्यामध्ये रोजगार हमी योजना जोमाने राबविण्यात येत असून यावर्षी १२.९२ कोटी मनुष्यदिन इतकी रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

चालू वर्षामध्ये काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. रोजगार हमी योजनेअंतर्गत रस्त्यांच्या बांधकामासाठी योजनांतर्गत व योजनेतर बांधकाम असा फरक काढून टाकण्यात आला आहे. तसेच, मुख्य रस्त्यांना जोडणारे शेत रस्ते, अंतर्गत ग्रामीण रस्ते, वाडया व मूळ गावांना जोडणारे रस्ते यांचे बांधकाम हाती घेण्याचे ठरविले आहे. राज्यातील दुष्काळग्रस्त भागात जवाहर रोजगार योजनेअंतर्गत अतिरिक्त १०,००० विहिरींचे आणि प्रत्येक दुष्काळग्रस्त जिल्ह्यांमध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत पिण्याच्या पाण्यासाठी विहिरींचे कामदेखील हाती घेण्यात आले आहे. रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांच्या मजुरीत १० रुपयांची वाढ येत्या गुढी पाडव्यापासून करण्यात येत आहे.

११. सर्व पाटबंधारे विकास महामंडळांच्या बाबतीत समानीकरणाचे तत्त्व माझ्या शासनाने स्वीकारले आहे व त्या अनुषंगाने संबंधित कायद्यांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याचे ठरविले आहे. पाटबंधारे प्रकल्प जलदगतीने पूर्ण करण्यासाठी, सर्व पाटबंधारे विकास महामंडळे सर्वतोपरी प्रयत्न करीत आहेत. म्हणून, विदर्भ विभागातील सर्व प्रकल्प व कोकण विभागातील नवीन प्रकल्प त्या त्या महामंडळाकडे सुपूर्द करण्याचे शासनाने ठरविले आहे.

पाटबंधारे विकास महामंडळांना अर्थसंकल्पीय नियतव्ययाव्यतिरिक्त रोख्यांद्वारे निधी उभारता येईल. ज्या महामंडळाच्या कार्यक्षेत्रात आदिवासी कार्यक्षेत्र असेल त्या महामंडळाच्या नियतव्ययातून काही प्रमाणात नियतव्यय आदिवासी उपयोजनेसाठी राखून ठेवण्यात येईल.

आदिवासी क्षेत्रात घेण्यात येणाऱ्या उपसा सिंचन योजनांसाठी महामंडळे निधी उपलब्ध करून देतील व ज्या उपसा सिंचन योजनांसाठी मापदंडा व्यतिरिक्त जो जादा खर्च लागेल त्या खर्चाची तरतूद आदिवासी उप-योजनेतून करण्यात येईल.

जून, २००० अखेरीस राज्यामध्ये निर्माण झालेली सिंचन क्षमता सुमारे ३६.६० लाख हेक्टर इतकी होती आणि जून,२००१ पर्यंत २.४६ लाख हेक्टर इतकी अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे.

१२. जल संधारणाची कामे गतिमान करण्यासाठी २२ ऑगस्ट, २००० पासून महाराष्ट्र जल संधारण महामंडळ स्थापन करण्यात आले असून राज्यातील १०,७१० गावांमध्ये जल संधारणाची कामे हाती घेतली आहेत.

विदर्भ विकास कार्यक्रमाखाली विदर्भ क्षेत्रातील पूर्वीच्या मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीसाठी या वर्षापासून व्यापक कार्यक्रम हाती घेण्यात येत आहे.

१३. पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कार्य ३ डिसेंबर,२००० पासून नागपूर येथे सुरु झाले आहे.

स्वयंरोजगाराला उत्तेजन देण्यासाठी आणि संकरित पैदासीचा कार्यक्रम अधिक जोमाने राबविण्यासाठी, ४५० सुशिक्षित बेरोजगार पशुवैद्यकांना प्रशिक्षण देण्यात येत असून मागास क्षेत्रात तितक्याच संख्येने पशुवैद्यकीय केंद्रे उभारण्यासाठी साधनसामग्री खरेदी करण्याकरिता त्यांना सहाय्य देण्यात येत आहे.

दूध उत्पादनाचा खर्च वाढल्यामुळे आणि लहान शेतकऱ्यांना दुधाचा किफायतशीर भाव मिळवून देण्याकरिता, शासनाने, दुधाच्या खरेदीच्या भावात प्रति लिटर ८० पैशांनी वाढ केली आहे. दूध उत्पादन क्षेत्रात दुधाच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी, बृहन्मुंबई दूध योजनेच्या हद्दीबाहेर दुधाच्या विक्रीचा भाव प्रति लिटर ५० पैशांनी कमी करण्यात आला आहे.

मासळी उतरविण्याच्या केंद्रांवर पुरेशा पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी, शासनाने, ६० कोटी रुपये खर्चाने १९ मासेमारी धक्क्यांचे व ७ बंदरांचे बांधकाम हाती घेण्याचे ठरविले आहे. मासेमारीत वाढ करणे व मच्छिमारांची कार्यक्षमता वाढविणे आणि त्यांना अधिक चांगली सुरक्षा पुरविणे, याकरिता, यांत्रिक नौका व आधुनिक नौकानयन साधनसामग्री सहाय्य कार्यक्रमांमध्ये भरीव वाढ करण्यात आली आहे.

मुंबई येथील तारापोरवाला मत्स्यालयाच्या जागी, १३४ कोटी रुपये इतक्या संपूर्ण विदेशी गुंतवणुकीद्वारे, पाण्याखालील अत्याधुनिक सागर सृष्टी उभारण्यासाठी नुकताच एक संयुक्त उपक्रम करार करण्यात आला आहे.

१४. जनतेची पिण्याच्या पाण्याची खरी गरज लक्षात घेऊन, माझ्या शासनाने नवीन पेय जल धोरण जाहीर केले आहे. राज्यातील काही भागात असलेली पिण्याच्या पाण्याची टंचाई विचारात घेता, शासनाने, पुरेशी आवश्यक उपाययोजना केली आहे. तसेच, "लोकसहभागातून ग्राम स्वच्छता" ही योजना राबविण्यासाठी, या वर्षापासून माझ्या शासनाने **संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा** सुरु केली आहे. या मोहिमेला राज्यातील जनतेकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

१५. मुद्रांक महानिरीक्षक, पुणे यांच्या कार्यालयाच्या संगणकीकरणाचा यावर्षी माझ्याकडून शुभारंभ करण्यात आला. यामुळे जनतेला नोंदणीकृत दस्तऐवज त्वरित मिळणे सुलभ झाले असून त्याला जनतेकडून उत्साही प्रतिसाद मिळत आहे. येत्या वर्षात राज्यातील बहुसंख्य तालुक्यांमध्ये या सुविधेचा विस्तार करण्याचे शासनाने प्रस्तावित केले आहे.

अंध व अपंग व्यक्तींना, निवासी, वाणिज्यिक किंवा औद्योगिक प्रयोजनांकरिता, जाहीर लिलाव न करता जमिनीचे नियतवाटप करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

माजी सैनिक आणि सेवेत असणारे जवान यांना जमीन देण्यासाठी असलेली उत्पन्नाची मर्यादा वार्षिक १२,००० रुपयांवरून ३५,००० रुपये इतकी वाढवण्यात आली आहे.

वतन जमिनी, नवीन धारण जमिनी आणि वर्ग दोन जमिनी यांच्या हस्तांतरणाची पद्धत अधिक सोपी करण्यासाठी, शासन या अधिवेशनात विधेयक सादर करणार आहे. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यातील बेदखल कुळांना न्याय देण्यासाठी, शासनाने मुंबई कुळवहिवाट अधिनियमात सुधारणा केली असून कोकण विभागातील अनेक लोकांना याचा लाभ होणार आहे.

अकृषिक आकारणीच्या दरात झालेल्या वाढीबाबतची जनतेची गाऱ्हाणी दूर करण्यासाठी, शासनाने, मार्च,१९९९ च्या निर्णयात सुधारणा केली असून जुन्या खातेदारांना, १९९१ च्या अकृषिक आकारणीच्या दरात महानगरपालिका क्षेत्रांमध्ये ३ पट आणि नगरपालिका क्षेत्रांत २ पट इतकी वाढ सीमित करण्याचे ठरविले आहे. नव्याने आकारणी केलेल्या मालमत्तांसाठी, महानगरपालिका क्षेत्रांमध्ये १९९१ च्या दराच्या ६ पट आणि नगरपालिका क्षेत्रांत ४ पट इतका दर सीमित केला आहे. मात्र ग्रामीण भागात अकृषिक आकारणीत वाढ होणार नाही. यामुळे जनतेला खूपच दिलासा मिळेल.

१६. मे, १९९९ मध्ये जम्मू व काश्मीर मधील नियंत्रण रेषेजवळ देशाचे संरक्षण करताना धारातीर्थी पडलेल्या सेना दलातील आणि निमलष्करी दलातील महाराष्ट्रातील जवानांच्या विधवांना अथवा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्यांना ५ लाख रुपये अर्थसहाय्य देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. ही योजना संपूर्ण देशात सीमेवर कोठेही कार्यरत असलेल्या सेना दलातील व निमलष्करी दलातील महाराष्ट्रातील जवानांना लागू करण्याचे शासनाने ठरविले आहे. त्याचप्रमाणे, ज्या जवानांच्या अपंगत्वाचे प्रमाण २० ते ४९ टक्के इतके आहे, त्यांना २५,००० रुपयांऐवजी १ लाख रुपये व अपंगत्वाचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा अधिक असेल, अशा जवानांना ५०,००० रुपयांऐवजी ३ लाख रुपये याप्रमाणे आर्थिक सहाय्यात वाढ केली आहे.

**महाराष्ट्र गौरव पुरस्कार योजना, १९९०** अनुसार सहा प्रकारच्या शौर्यपुरस्कारांच्या बाबतीत युद्धात मरण पावलेल्या जवानांच्या विधवांना अथवा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्यांना रोख रक्कम व दरमहा ७५० रुपये इतके निवृत्तिवेतन देण्यात येते. शासनाने आता आणखी आठ प्रकारच्या शौर्यपुरस्कारांच्या बाबतीत आर्थिक सहाय्य देण्याचे ठरविले असून या सर्वांचे निवृत्तिवेतन, १ जुलै, २००० पासून १००० रुपये इतके करण्याचे ठरविले आहे.

१७. माझ्या शासनाने सहकारी संस्थांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी विकास महामंडळाची स्थापना केली आहे. या महामंडळाच्या कामकाजास १ जानेवारी, २००१ पासून प्रारंभ झाला असून, महामंडळाने १०० कोटी रुपयांचा निधी खाजगी कर्जरोख्यांच्या माध्यमातून उभा केला आहे. या निधीचा विनियोग सहकारी संस्थांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी आणि आजारी सहकारी संस्थांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी करण्यात येणार आहे. या महामंडळामुळे सहकार चळवळीला नवी दिशा प्राप्त होईल असा मला विश्वास वाटतो.

सहकारी संस्थांच्या व्यवस्थापन समितीमध्ये सध्या अनुसूचित जाती / जमाती यांच्यासाठी समिती सदस्याचे एक पद राखीव ठेवण्यात आले आहे. या तरतुदीची व्याप्ती वाढवून आता भटक्या जमाती / विमुक्त जातीसाठी एक आणि इतर मागासवर्गीयांसाठी एक अशी समिती सदस्यांची दोन जादा राखीव पदे निर्माण करण्याचा निर्णय माझ्या शासनाने घेतला आहे. त्यामुळे समाजातील शोषित आणि दुर्लक्षित घटकांना सहकारी निर्णय प्रक्रियेमध्ये स्थान मिळणार आहे.

१८. एकाधिकार कापूस खरेदी योजनेची मुदत भारत सरकारच्या परवानगीने ३० जून, २००१ पर्यंत वाढविण्यात आली आहे. शासनाने, सरासरी चांगला दर्जा असलेल्या एच-४ जातीच्या कापसासाठी प्रति क्विंटल २३०० रुपये हा दर निश्चित केला आहे. कापूस उत्पादकांना दिलासा देण्याकरिता, शासनाने, १ जानेवारी, २००१ पासून हमी किंमत व अधिक किंमतीच्या अग्रिमाचा पहिला हप्ता एकत्रितपणे देण्याचे ठरविले आहे.

मागील कापूस हंगामात अंदाजे ३६२३ कोटी रुपये किंमतीच्या १७५.६३ लाख क्विंटल कापसाची विक्रमी खरेदी झाली.

शासनाने, राज्यात बुटीबोरी-नागपूर, यवतमाळ किंवा अमरावती, खानदेश विभाग, कोल्हापूर व औरंगाबाद या ठिकाणी पाच वस्त्रोद्योग क्षेत्रे उभारण्याचे ठरविले आहे.

शासनाने, २०००-२००१ मध्ये, आधारभूत धान्य खरेदी योजना कार्यान्वित केली असून, या योजनेअंतर्गत अंदाजे १०१.६५ कोटी रुपये किंमतीच्या, १९,९८,८०१ क्विंटल ज्वारी,बाजरी, मका व भात यांची खरेदी करण्यात आली आहे.

१९. शासनाने, डोंगराळ व आदिवासी भागांमधील ५०० पेक्षा अधिक आणि इतर भागांमधील १००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेली गावे बारमाही रस्त्यांनी जोडण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. ३१ मार्च, २००० पर्यंत अशी ९६ टक्के गावे जोडण्यात आली. या वर्षात नाबार्डच्या ८०६ कोटी रुपयांच्या सहाय्याने ५०३४ कि.मी. ग्रामीण रस्त्यांची सुधारणा व डांबरीकरण आणि ३१९ पुलांच्या कामांचा समावेश असलेला कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. तसेच, अंदाजे १००० कि.मी. रस्त्यांची आणि ४०० पुलांची सुधारणा करण्यासाठी हुडकोने १७३ कोटी रुपये कर्ज मंजूर केले आहे.

२०. सन १९६० मध्ये महाराष्ट्राची निर्मिती झाल्यापासून स्थानिक स्वराज्य संस्थांची वाढ होण्यासाठी, त्यांचे मजबुतीकरण करण्यासाठी व जनतेला अधिकार देण्याचे तत्त्व अंमलात आणण्यासाठी महाराष्ट्र प्रयत्नशील आहे. महाराष्ट्राने प्रथम १९६२ मध्ये त्रिस्तरीय पंचायत राज संस्थांची स्थापना केली. सन १९९२ मध्ये झालेल्या ७३ व्या घटना दुरुस्तीची अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असून त्या अनुषंगाने राज्य शासनाकडील महत्त्वाच्या योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करण्याबाबतच्या निर्णयाची प्रक्रिया १९९४ मध्ये सुरु करण्यात आली असून माझ्या शासनाने सदर निर्णय यावर्षी अंमलात आणला आहे. त्यास अनुसरून, समाजकल्याण, आरोग्य, कृषि, पाणी पुरवठा व शिक्षण अशा ९ प्रशासकीय विभागांच्या १२२ योजना माझ्या शासनाने जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित केल्या आहेत.

२१. राज्यातील माहिती तंत्रज्ञान उपक्रमांमध्ये वाढ होण्याकरिता, शासनाने, माहिती तंत्रज्ञान संस्थांना १०० टक्के अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकास मुभा देणे आणि निवासी, औद्योगिक, वाणिज्यिक आणि काही मर्यादेपर्यंत ना विकास क्षेत्र यांमध्ये माहिती तंत्रज्ञान संस्था उभारण्यास परवानगी देणे, यांसारखी काही प्रोत्साहने दिली आहेत.

माझ्या शासनाने विशिष्ट नियमितीकरण आकार बसवून राज्यातील गुंठेवारी विकास नियमित करण्याचे आणि या भूखंडावर मूलभूत सुविधा पुरविण्याचे ठरविले आहे.

कापड गिरणी कामगारांचे हित लक्षात घेऊन व अशा गिरण्यांचे पुनरुज्जीवन आणि आधुनिकीकरण करण्यास मदत करण्याकरिता, माझ्या शासनाने, **गिरण्यांच्या जमिनींच्या** पुनर्विकासासंबंधात सुधारित धोरण स्वीकारले आहे.

२२. ५०,००० पेक्षा जास्त लोकसंख्या असणा-या ६१ शहरांतील झोपडपट्टीवासीयांच्या संरक्षणाकरिता, शासनाने अलिकडेच आपले झोपडपट्टीविषयक नवीन धोरण जाहीर केले आहे. त्यानुसार १ जानेवारी, १९९५च्या मतदार यादीत ज्यांची नावे आहेत आणि जे सलगपणे तेथेच राहतात, अशाच व्यक्ती संरक्षणाकरिता पात्र समजल्या जाऊन त्यांना फोटोपास देण्यात येतील. १ जानेवारी, १९९५ नंतर केलेले कोणतेही अतिक्रमण खपवून घेतले जाणार नाही.

राज्याच्या विविध भागात झोपडपट्ट्यांची झालेली वाढ आणि अशा झोपडपट्ट्यांमधील आरोग्यास बाधक स्थिती विचारात घेऊन, शासनाने, मुंबई वगळता ५०,००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ६० शहरांत सुमारे ५०,००० घरांचे बांधकाम करून, झोपडपट्टीवासीयांचे राहणीमान सुधारण्याचे ठरविले असून या लोक आवास योजनेअंतर्गत, लाभधारकांना २२५ चौरस फूट क्षेत्रफळ असलेली घरे देण्यात येत आहेत.

इंदिरा गांधी वृद्ध भूमिहीन शेतमजूर सहाय्य योजनेत १ जुलै, २००० पासून सुधारणा करून या योजनेअंतर्गत प्रत्येक लाभधारकाला देण्यात येणाऱ्या मदतीत दरमहा १०० रुपयांवरून २५० रुपये वाढ करण्यात आली आहे.

बिडी घरकुल योजनेअंतर्गत शासनाने बिडी कामगारांना घरांच्या बांधकामाकरिता प्रत्येक गाळ्यासाठी २०,००० रुपये इतके अर्थसहाय्य देण्याचे ठरविले आहे.

माझ्या शासनाने येत्या वर्षापासून **ग्रामीण निवारा योजना** राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेखाली ग्रामीण क्षेत्रात ३३ हजार घरे व ५० हजार पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरात १८ हजार घरे अशी एकूण ५१ हजार घरे बांधण्यात येतील. ग्रामीण क्षेत्रात प्रत्येक लाभार्थीला केंद्र व राज्य शासनाचे मिळून १०,००० रुपये इतके अर्थसहाय्य मिळेल. त्याचप्रमाणे, समाजकल्याण विभाग व आदिवासी विकास विभागाकडून मिळणारे अनुदान त्या त्या क्षेत्रांतील लाभार्थींना उपलब्ध होईल. या योजनेचा लाभ घेण्याकरिता लाभार्थीच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ३२,००० रुपये राहील व लाभार्थीचे रोख अंशदान बांधकाम किंमतीच्या १० टक्के राहील. या योजनेअंतर्गत २०,००० रुपये, ३०,००० रुपये व ५०,००० रुपये किंमतीची तीन प्रकारची घरे बांधण्याचे ठरविले आहे.

२३. मुंबई शहरातील गुन्हेगारीस आळा घालण्यासाठी शंभर भरारी पथके निर्माण केली आहेत. न्यायमूर्ती श्रीकृष्ण आयोगाच्या अहवालाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी विशेष कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे. राज्य मानवी हक्क आयोग स्थापन करण्यात आला असून त्याचे कामकाज लवकरच सुरु होईल.

राज्यात कायदा व सुव्यवस्था विषयक स्थिती शांततापूर्ण असून मुंबई शहरातील संघटित गुन्हेगारी प्रभावीपणे नियंत्रणात ठेवण्यात आली आहे.

राज्य पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी गतिशीलता, दळणवळण, प्रशिक्षण, गुप्तवार्ता यात सुधारणा करण्यासाठी आणि साधनसामग्री खरेदी करण्यासाठी यावर्षी १८४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

पोलीस विभागात बढतीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी २२,३४४ पदांची श्रेणीवाढ केली आहे. पोलीस शिपायाच्या भरतीकरिता किमान शैक्षणिक अर्हता इयत्ता १२ वी पर्यंत वाढविण्यात आली आहे.

२४. १५ जुलै, २००० पासून अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीशाचे न्यायालय स्थापन करण्यात आले आहे आणि लातूर जिल्ह्यातील अहमदपूर आणि उद्‌गीर येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश आणि दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांचे जोड न्यायालयसुद्धा १० फेब्रुवारी, २००१ पासून स्थापन करण्यात आले आहे.

राज्यातील न्यायालयांमध्ये मोठया संख्येने प्रलंबित असलेली प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी अकराव्या केंद्रीय वित्त आयोगाने प्रत्येक जिल्ह्यात पाच अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालये स्थापन करण्याबाबत शिफारस केली आहे. महाराष्ट्रामध्ये एकूण १३५ न्यायालये स्थापन करण्यासाठी केंद्र शासनाने, २०००-२००५ या पंचवार्षिक योजनेअंतर्गत ५४.०८ कोटी रुपये देण्याचे ठरविले आहे. या रकमेपैकी ५.४४ कोटी रुपये इतकी रक्कम राज्याकडे सुपूर्द करण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करून, पुढील वित्तीय वर्षापासून ही न्यायालये स्थापन करण्यासाठीची कृती योजना मंजूर केली असून एप्रिल, २००१ पासून या न्यायालयांचे कामकाज प्रत्यक्ष सुरु होईल.

२५. खाजगी क्षेत्राच्या सहभागाद्वारे लहान बंदरांच्या विकासाच्या संबंधातील सुधारित धोरणानुसार, २३०० कोटी रुपयांच्या अपेक्षित गुंतवणुकीद्वारे दिघी व रेवस ही बंदरे खाजगी उद्योजकांकडून विकसित करण्यात येतील व २००४ मध्ये ती बंदरे पूर्णतः कार्यरत झाल्यानंतर १२ दशलक्ष टन इतक्या मालवाहतुकीसाठी सक्षम होतील.

२६. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी **"पॅलेस ऑन व्हील्स"** च्या धर्तीवर राज्यात लक्झरी ट्रेन सुरु करण्यात येत आहे. यासाठी आवश्यक तो करार रेल्वे बोर्डाबरोबर करण्यात आला आहे. १ मे,२००१ पासून मुंबई शहरात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी मुंबई शॉपिंग फेस्टीवलचे आयोजन करण्यात येत आहे.

पर्यटनाला चालना देण्यासाठी, पर्यटकांना मार्गदर्शन व संरक्षण देणारी **पर्यटक पोलीस** ही योजना सुरु केली आहे.

२७. राज्यामध्ये प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याच्या दृष्टीने आणि शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुलांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी, माझ्या शासनाने **महात्मा फुले शिक्षण हमी योजना** सुरु केली आहे. तसेच, वस्तीशाळा योजनेअंतर्गत वाडया, पाडे, तांडे व वस्त्या येथील मुलांना त्यांच्या वसतिस्थानांपासून अर्ध्या किलोमीटरच्या आत प्राथमिक शिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

पहिलीपासून इंग्रजी शिकविण्याच्या निर्णयाची यशस्वी अंमलबजावणी माझ्या शासनाने केली असून त्यास सर्व स्तरांतून उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला आहे. दुसऱ्या इयत्तेसाठी इंग्रजीचा अभ्यासक्रम तयार असून तो शिकविण्याची सर्व तयारी पूर्ण झाली आहे.

मातृत्वाचा सन्मान करण्यासाठी शाळेच्या अभिलेखामध्ये वडिलांच्या नावाबरोबरच आईच्या नावाचीही नोंद करण्याचे शासनाने ठरविले आहे.

महाराष्ट्रात संगणक बँकेची स्थापना करण्यात आली असून राज्यातील विविध शाळांना सुमारे ३,५०० संगणक पुरविण्यात आले आहेत. या विधानमंडळातील सन्माननीय सदस्यसुद्धा त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या निधीमधून शाळांकरिता संगणक खरेदी करून त्याद्वारे नवीन तंत्रज्ञानाच्या प्रसारामध्ये सहभागी झाले आहेत, याचा मला विशेष आनंद होत आहे.

२८. २१ व्या शतकातील माहिती व तंत्रज्ञानाचे महत्त्व लक्षात घेऊन राज्यातील उच्च, व्यवसाय व तंत्रशिक्षण यांमधील सर्व विद्यार्थ्यांना संगणकाचे तसेच माहिती तंत्रज्ञानातील मूलभूत ज्ञान अवगत करून देण्यासाठी माझ्या शासनाने **“ महाराष्ट्र राज्य माहिती तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम ”** सुरु केला आहे. या कार्यक्रमाद्वारे राज्यातील सुमारे १० लाख विद्यार्थी व विद्यार्थिनींना आणि ५०,००० शिक्षकांना शिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे. यामुळे मुख्यत्वेकरून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञानासंबंधातील ज्ञान संपादन करण्यास मदत होईल. या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने **“ महाराष्ट्र ज्ञान मंडळ ”** स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

सन २००१-२००२ मध्ये ४० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या इमारतींची बांधकामे हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे. वाचनाची सुविधा पुरविण्यासाठी आगामी वर्षात राज्यामध्ये १९ नवीन जिल्हा ग्रंथालयांची स्थापना करण्याचे निश्चित झाले आहे.

शासनाने सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये पदवी आणि तंत्रनिकेतन पाठ्यक्रमांसाठी, महिलांकरिता ३० टक्के आरक्षण लागू केले आहे. परिणामी, महिला उमेदवारांना या महाविद्यालयांत १८,५०० जागा उपलब्ध झाल्या आहेत. विविध विद्यापीठ मंडळांमध्ये महिलांना व सामाजिकदृष्ट्या मागासवर्गांना विशिष्ट प्रतिनिधित्व देण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ यामध्येही सुधारणा करण्यात आली आहे.

२९. प्रादेशिक रोगनिदान व उपचार रुग्णालये स्थापन करण्याच्या शासनाच्या धोरणानुसार, पहिल्या टप्प्यात नाशिक व अमरावती येथे अशी रुग्णालये उभारण्याचे काम हाती घेतले आहे. जागतिक बँकेचे सहाय्य असलेला ७४७.५८ कोटी रुपये खर्चाचा महाराष्ट्र आरोग्य यंत्रणा विकास प्रकल्प कार्यान्वित झाला असून या प्रकल्पांतर्गत जिल्हा व उप विभागीय स्तरावरील रुग्णालयांमध्ये १४४ विकास कामे हाती घेण्यात आली आहेत. जागतिक बँकेच्या सहाय्याने मोतीबिंदु अंधत्व नियंत्रण प्रकल्पांतर्गत २१ जिल्ह्यांच्या मुख्यालयांमध्ये २० खाटांच्या विनामूल्य नेत्रकक्षांची आणि शस्त्रक्रियागारांची स्थापना करण्यात आली आहे.

एडस् नियंत्रण अभियानामधील स्वयंसेवी संघटनांचे महत्त्व विचारात घेता, महाराष्ट्र राज्य एडस् नियंत्रण संस्थेने स्वयंसेवी संघटनांच्या मदतीने २४ लक्ष्याधारित कृती प्रकल्प कार्यान्वित केले आहेत.

राज्यात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम जोमाने राबविण्यात येत असून या मोहिमेमुळे राज्यात पोलिओग्रस्तांची संख्या डिसेंबर, २००० पर्यंत फक्त ७ वर आली आहे, हे सांगण्यास मला आनंद होत आहे. आम्ही, महाराष्ट्रातून पोलिओचे संपूर्णपणे निर्मूलन करण्याच्या मार्गावर आहोत.

ग्रामीण क्षेत्रातील आरोग्यविषयक सुविधांचे बळकटीकरण व विस्तारीकरण करण्यासाठी, माझ्या शासनाने, मागील वर्षामध्ये ५१ ग्रामीण रुग्णालये, ७३ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ३० उपकेंद्रे स्थापन केली आहेत.

माझ्या शासनाने मागील वर्षी **" राज्य लोकसंख्या धोरण "** जाहीर केले आहे. कुटुंब नियोजन कार्यक्रम महाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने राबविला जात आहे. छोट्या कुटुंबाचा अवलंब करण्याकरिता जनतेस आरोग्य शिक्षणाद्वारे प्रवृत्त करण्यावर भर देण्यात येत आहे. कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया कार्यक्रमात पुरुषांचा सहभाग वाढावा तसेच दोन अपत्य असलेल्या जास्तीत जास्त जोडप्यांना शस्त्रक्रियेसाठी प्रवृत्त करण्याचे प्रयत्न चालू आहेत. तसेच, २००४ पर्यंत जन्माचे प्रमाण दरहजारी २१ वरून १८ वर आणण्याचाही मानस आहे.त्याचबरोबर कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमाचा दर्जा उत्तम राखला जावा यासाठी माझे शासन कसोशीने प्रयत्न करीत आहे.

३०. नवीनतम व अत्याधुनिक वैद्यकीय साधनसामग्री उपलब्ध करून देऊन त्याद्वारे राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांमधील सुविधांमध्ये वाढ करण्याचे शासनाने ठरविले आहे. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून, सी.टी. स्कॅन मशीन, विविध क्रिटिकल कार्डिअॅक केअर मशीन आणि नॉन-इन्व्हॅसिव मशीन यांसारखी उपकरणे औरंगाबाद व पुणे येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

हेपॅटायटीस-बी सारख्या आजाराचे वाढते प्रमाण विचारात घेता, शासनाने, नागपूर येथील अतिविशेषोपचार रुग्णालयात आवश्यक त्या सुविधा पुरविल्या आहेत.

समाजातील दुर्बल गटातील महिलांसाठी कॅन्सरच्या उपचाराची वाढती गरज विचारात घेऊन, शासनाने, राज्यातील महिलांसाठी पहिले कॅन्सर उपचार केंद्र कामा व आल्ब्लेस रुग्णालय, मुंबई येथे उभारण्याचे ठरविले आहे. या केंद्रात २५२ लाख रुपये किंमतीच्या टेली कोबाल्ट मशीन, ब्रॅची थेरपी मशीन आणि ट्रिटमेंट प्लॅनिंग सिस्टिम यांचा अंतर्भाव असेल. हे केंद्र ३१ मार्च, २००१ पर्यंत कार्यान्वित होईल अशी अपेक्षा आहे.

राज्यातील बहुसंख्य भाषिकांच्या सोयीसाठी वैद्यकीय सामाईक प्रवेश परीक्षेची प्रश्नपत्रिका सन २००१ पासून इंग्रजी बरोबरच मराठी व उर्दू या भाषांतून उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

३१. राज्याच्या एकूण योजनांतर्गत अर्थसंकल्पीय नियतव्ययापैकी ९.५ टक्के म्हणजेच ५५१ कोटी रुपये इतकी रक्कम अनुसूचित जातीच्या घटकांच्या सामाजिक व आर्थिक विकासाकरिता विशेष घटक योजनेअंतर्गत राखून ठेवली आहे.

३२. शासनाने, राज्य योजनेच्या अर्थसंकल्पीय नियतव्ययाच्या ९ टक्के म्हणजेच ४५० कोटी रुपये इतकी रक्कम २००१-२००२ या वर्षाकरिता आदिवासी उप-योजनेसाठी राखून ठेवली आहे.

३३. सन २००१ हे वर्ष **महिला सक्षमीकरण वर्ष** म्हणून राबविण्यात येत आहे. शासनाने महिलांच्या सक्षमीकरणाकरिता महिला धोरण, २००१ जाहीर केले आहे. हे धोरण विधानमंडळाच्या या अधिवेशनात चर्चेसाठी मांडण्यात येईल.

विशेष घटक कार्यक्रमांतर्गत, अनुसूचित जातींच्या महिलांकरिता **महिला सक्षमीकरण कार्यक्रम** निवडक जिल्ह्यांमध्ये पथदर्शी तत्त्वावर राबविण्यात येईल. सध्या मुंबई आणि नागपूर येथे राबविण्यात येत असलेली **चाईल्ड लाईन द्वारा राष्ट्रीय बाल संरक्षण योजना** संपूर्ण राज्यात विस्तारित करण्यात येईल.

जागतिक बँकेचे सहाय्य असलेला एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प-तीन याअंतर्गत, १४,४५० आंगणवाड्या आणि ८ लाख लाभधारकांचा समावेश असलेले ९९ नवीन प्रकल्प सुरु करण्यात येत आहेत. या प्रकल्पामध्ये जागतिक बँकेची एकूण गुंतवणूक २८१ कोटी रुपये असून राज्याचा हिस्सा २१० कोटी रुपयांचा आहे.

३४. **मौलाना आझाद अल्पसंख्याक वित्तीय विकास महामंडळ** स्थापन करण्यात आले असून **अल्पसंख्याक आयोग** पुनरुज्जीवित करण्यात आला आहे.

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या** जीवनातील आग्रा या शहराचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन, तेथे **छत्रपती शिवाजी महाराजांच्या** अश्वारूढ पुतळयाची प्रतिष्ठापना करण्याकरिता माझ्या शासनाने वित्तीय सहाय्य दिले असून यावर्षी **शिवजयंतीच्या** दिवशी त्यांच्या पुतळयाचे अनावरण करण्यात आले.

माझ्या शासनाने, २००१ मध्ये **श्री भगवान महावीर** यांची २६०० वी जयंती **जनकल्याण महोत्सव** म्हणून साजरी करण्याचे ठरविले असून यासंबंधात शिफारशी करण्यासाठी समिती स्थापन केली आहे.

३५. दीर्घकाळ अनिर्णीत असलेला महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सामंजस्याने सुटावा म्हणून महाराष्ट्र शासनाच्या उच्चाधिकार समितीच्या सदस्यांनी २२ ऑगस्ट, २००० रोजी नवी दिल्ली येथे आणि १७ फेब्रुवारी, २००१ रोजी मुंबई येथे मा.पंतप्रधानांची भेट घेतली. मा. पंतप्रधानांनी कर्नाटक व महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांची संयुक्त बैठक बोलावून हा प्रश्न सामंजस्याने सोडविण्यासाठी मदत करण्याचे मान्य केले आहे.

३६. पातळ प्लास्टिकच्या पिशव्यांच्या वापरावरील निर्बंधाची प्रभावी अंमलबजावणी राज्यातील सर्व महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रांमध्ये १५ ऑगस्ट, २००० पासून सुरु झाली असून त्याचे दृश्य परिणाम सर्व प्रमुख शहरांमध्ये आणि विशेषतः मुंबईच्या समुद्रकिनाऱ्यांवर व सार्वजनिक ठिकाणी दिसून आले आहेत.

३७. सन्माननीय सदस्यहो, या अधिवेशनात पूरक मागण्या, २००१-२००२ चा अर्थसंकल्प, लेखानुदान, विवक्षित अध्यादेशांचे अधिनियमांमध्ये रूपांतर करणारी विधेयके आणि तातडीच्या स्वरूपाची नवीन विधेयके, तसेच, आपल्यापुढे विचारार्थ मांडण्यात येईल असे इतर तातडीच्या स्वरूपाचे शासकीय व अशासकीय कामकाज, यांवर आपल्याला विचार करावयाचा आहे.

या अधिवेशनातील आपल्या सर्व विचारविमर्शास मी सुयश चिंतितो.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !**